# प्रकरण १७

इतर उपयुक्त माहिती

## नेहमी विचारले जाणारे प्रश्न

१) रुग्णालयामध्ये रक्तपेढी आहे का

उत्तरः नाही. रुग्णालयामध्ये रक्तपेढी नाही.

२) रुग्णालयात पैसे भरुन विशेष खोल्या मिळतात काय

उत्तरः नाही. रुग्णालयात अश्या विशेष खोल्या नाहीत.

३) ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी उपलब्ध आहे का ?

उत्तरः होय. बहुतेक सर्व विभागामध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध आहेत.

४) औषधासाठी पैसे दयावे लागतात काय

उत्तरः नाही. सर्व औषधे मोफत आहेत.

५) रुग्णालयात आपत्कालीन विभाग आहे काय

उत्तरः रुग्णालयात अपघातग्रस्त विभाग नाही. परंतु विशेष आपत्कालीन बाहयरुग्ण विभाग २४ तास सुरु असतो व सर्व आपत्कालीन रुग्णांची तपासणी करुन गरज पडल्यास त्यांना रुग्णालयात भरती केले जाते. कायदेशीर वैद्यकिय रुग्णांवर (मेडिको पेशंट) प्रथमोपचार केला जातो व नंतर ज्या रुग्णालयात अशा रुग्णांवर उपचार करण्याची सुविधा आहे अशा ठिकाणी पाठविले जाते.

६) क्ष – किरण फोटो व विद्युत हृदयस्पंदन आलेख या सेवांकरिता पैसे दयावे लागतात काय

उत्तरः होय. क्ष-किरण फोटो व विद्युत हृदयस्पंदन आलेख या सेवा कमी दारात पुरविल्या जातात.

## रुग्ण शिक्षण व जन शिक्षण

खालीलप्रकारे रुग्ण शिक्षण व जन शिक्षण केले जाते.

प्रसुती पूर्व देखरेख, कुटुंब नियोजन, लसीकरण, स्तनपान, ओ.आर.एस.एच्.आय.व्ही./ एड्सची माहिती आणि आरोग्यशिक्षण , बाहयरुग्ण विभागामध्ये कुशल व अनुभवी समुपदेशकाव्दारे शिक्षणसत्र घेतली जातात. दकश्राव्य साधने व आई.ई. सी. सामुग्री शिक्षणासाठी वापरली जाते. शिक्षण सत्राला हजर रहाणे सक्तीचे नाही. आरोग्य शिक्षण मोफत दिले जाते. रुग्णालयाशी संलग्न आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकांव्दारे समाजातील लोकांना शिक्षण येण्यासाठी उद्युक्त केले जाते.